# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड
# (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प )

## कस्तुरचंद पार्क मेट्रो स्टेशन ते रामदेवबाबा विद्यापीठ दरम्यान फीडर सेवा २८ ऑगस्टपासून



नागपूर: महा मेट्रो आणि नागपूर महानगरपालिका (NMC) यांच्या संयुक्त विद्यमानाने कस्तुरचंद पार्क मेट्रो स्टेशन ते रामदेवबाबा विद्यापीठ दरम्यान विशेष फीडर बस सेवा गुरुवार, २८ ऑगस्ट २०२५ पासून सुरु होणार आहे. ही सेवा विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित, सोयीस्कर आणि परवडणारी ठरणार आहे. या सेवेसंदर्भात मेट्रो संवाद या उपक्रमाअंतर्गत एक बैठक नुकतीच झाली होती. या बैठकीत कस्तुरचंद पार्क मेट्रो स्टेशन ते रामदेवबाबा विद्यापीठ थेट फीडर बस सेवा सुरु करण्याबाबत सविस्तर चर्चा झाली.

या बैठकीस महा मेट्रो,नागपूर महानगरपालिका आणि चलो टीमचे अधिकारी उपस्थित होते. या प्रसंगी डॉ. राजेश पांडे (उपकुलगुरु, रामदेवबाबा विद्यापीठ), श्री. महेश मोरोनी (संयुक्त महाव्यवस्थापक मालती मॉडेल इंटिग्रेशन, मेट्रो मेट्रो), श्री. नीमसरकर (ऑपरेशन्स मॅनेजर, चलो टीम – मनपा बस सेवा) यांच्यासह इतर अधिकाऱ्यांची उपस्थिती होती. विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी या बैठकीत थेट फीडर बस सेवा सुरु करण्याची मागणी केली होती. त्यांच्या प्रवासासंबंधी अडचणी व सूचना त्यांनी अधिकाऱ्यांपुढे मांडल्या. विद्यार्थ्यांची गरज लक्षात घेऊन मेट्रो व मनपाने त्वरीत निर्णय घेत फीडर सेवा सुरु करण्याचा निर्णय घेतला.

विद्यार्थ्यांसाठी विशेष शिबीर:

विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी विद्यापीठ परिसरात तीन दिवसांचे विशेष शिबीर आयोजित करण्यात आले होते या शिबिरात महा कार्डचे वितरण व मनपा बस पास देण्यात आल्या,अनेक विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेतला असून मेट्रो आणि फीडर बसचा प्रवास सुलभ होणार आहे.

सदर फिडर बस सेवाचा मार्ग हा कस्तुरचंद पार्क मेट्रो स्टेशन ते रामदेवबाबा विद्यापीठ असणार असून ही सेवा विद्यार्थ्यांना मेट्रो स्टेशन येथून विद्यापीठ पर्यंत सुरक्षित, वेळेवर आणि थेट प्रवास करण्याची सुविधा देणार आहे..